# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २९/०३/२०२३

दुखापत :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो.स्टे. खोलापुरी गेट अप.न. ५५/२०२३ कलम ३२४ भा.द.वी. | कांडलकर प्लांट अमरावती | दि. २७/०३/२०२३ चे १७/०० वा. दि. २७/०३/२०२३ चे १७/२० वा. दि. २७/०३/२०२३ चे २०/२१ वा. | धनराज मोतीराम खोब्रागडे वय ४५ वर्ष रा. कांडलकर प्लॉंट अमरावती | शुभम रघुनाथराव ढोके वय २० वर्ष रा. कांडलकर प्लॉंट अमरावती | यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यात राहत असुन यातील आरोपीचे घराचे घरकुलाच्या बांधकामाचा ठेका ३,०००००/- रुपयात करारनाम्याप्रमाने फिर्यादी सोबत झाला होता. त्यापैकी ९५०००/- रुपये फिर्यादीला मिळणे बाकी होते व घराचे बांधकामात स्लॅब करणे बाकी होता त्याबाबत फिर्यादी व आरोपीचे सकाळी ११/०० वा. बोलने झालेले असतांना सुध्दा यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा त्याचे घरी झोपलेला असतांना आरोपी हा फिर्यादीचे घराच्या समोर आला व आवाज देवुन म्हटले की उठ रे आपल्या बांधकामाचे काय झाले तेव्हा फिर्यादी हा बाहेर आला असता यातील आरोपीने त्याला आढवाड करुन मारहाण केली. फिर्यादीने त्यास पकडले असता आरोपीने फिर्यादीचे घरासमोरील एक विट्ट उचलुन फिर्यादीचे डोक्यात वारंवार मारुन त्याला जखमी केले. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व मेडीकल सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २. | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ४२३/२३ कलम ३७९,३४ भादवी | गर्ल्स हायस्कुल परशुराम क्लिनिक च्या उजव्या बाजुला अमरावती | दि २८-०३-२३ चे ०१.०० वा दरम्यान<br>दि २८-०३-२३ चे १८.१६ वा | रोशन धर्मपाल खोब्रागडे वय २५ वर्षे रा बारस्कर ले आऊट शेगाव रहाटगाव रोड अमरावती | अज्ञात | यातील हकीकत अश्या प्रकारे आहे कि नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे सिव्हिल इंजीनिअर असुन त्याचे कॉम्पलेक्स चे काम सुरु आहे तिथे बांधकामाचे साहित्य पडलेले असुन तिचे चौकीदार रविंद्र बळवंत आले रा पराजंपे कॉलनी यास ठेवलेले असुन घटना ता वेळी व ठिकाणी अज्ञात चोरट्यांनी लोखंडी रॉडचे तुकडे २० ते २५ एमएम साईडचे २ फुट लांबीचे २५ ते ३० नग घेऊन गेले चौकीदार रविंद्र भावे यांनी त्याना बघीतले असुन तिन गाड्यावर ज्यामध्ये २ बाईक व १ मोपेड आल्या होत्या २ बाईकवर प्रत्येकी ३ जण व मोपेडवर २ जण असे ८ जणानी सदर लोखंडी रॉडचे वजन अंदाजे ६० ते ६५ किलो वजनाचे किंमत अं ३००० रु चे कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले. अश्या फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ ईतर :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर अप नं २२६/२०२३ कलम | कस्तुरबा कन्या शाळा जवळ श्याम नगर अमरावती | दि २८/०३/२०२३ चे १९/४५ वा. दरम्यान<br><br>दि | सरतर्फे पोहेकॉ प्रेमराव वानखडे ब नं ८०७ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | सचिन देवीदास तोटे वय ३०रा कुंभारवाडा बुधवारा अमरावती | हकिकत अशा प्राकरे आहे कि, यातील फिर्यादी हे पो स्टाफ सह पो स्टे हददीत पेट्रोलींग करीत असतांना नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा त्याच्या ताब्यातील रुद्रा चायनीज हातगाडी सार्वजनीक ठिकाणी धोकादायक स्थीतीत ज्वालाग्रही पदार्थाचा हयगयीने मानवी जिवन धोक्यात येईल किंवा मानवाला नुकसान होवु शकेल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने ज्वालाग्रही पदार्थाचा गॅस सिलेंडर सार्वजनीक रोडवर आपल्या फायदयासाठी कृती /व्यवसाय करतांना मिळुन आला वरुन सदर आरोपीचा हा गुन्हा कलम २८५ भादवी प्रमाणे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २८५ भादवी | | २८/०३/ २०२३ चे २३/०३ वा. | | | होत असल्याने त्याचे विरुध्द सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर अप नं २२७/२०२३ कलम २८५ भादवी | कस्तुरबा कन्या शाळा जवळ श्याम नगर अमरावती | दि २८/०३/ २०२३ चे १९/४५ वा. दरम्यान<br><br>दि २८/०३/ २०२३ चे २३/११ वा. | सरतर्फे नापोकॉ रुपेश माहुरे ब नं ४२२ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | प्रमोद प्रभाकर राहटे वय ४२ रा प्रशांत नगर हनुमान मंदीरा जवळ अमरावती | हकिकत अशा प्राकरे आहे कि, यातील फिर्यादी हे पो स्टाफ सर पो स्टे हददीत पेट्रोलींग करीत असतांना नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा त्याच्या ताब्यातील इव्हनींग पॉइंट अंडा सेंटर हातगाडी ही सार्वजनीक ठिकाणी धोकादायक स्थीतीत ज्वालाग्रही पदार्थाचा हयगयीने मानवी जिवन धोक्यात येईल किंवा मानवाला नुकसान होवु शकेल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने ज्वालाग्रही पदार्थाचा गॅस सिलेंडर सार्वजनीक रोडवर आपल्या फायदयासाठी कृती /व्यवसाय करतांना मिळुन आला वरुन सदर आरोपीचा हा गुन्हा कलम २८५ भादवी प्रमाणे होत असल्याने त्याचे विरुध्द सदरचा गुन्हा दाखल |
| ७ | **पो स्टे गाडगे नगर अमरावती**<br>**अप क्र ४२४/२३ कलम ३०९,५०६ भादवि** | **सिदधी विनायक कॉलनी अमरावती** | **दि २८-०३-२३ चे १४.३० वा दरम्यान**<br>**दि २८-०३-२३ चे १८.५५ वा** | **सुरेश हरिशचंद्र कडु वय ५९ वर्ष रा सिदधी विनायक कॉलनी अमरावती** | **एक महिला** | **यातील हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी चे घरी दि. २६.३.२३ रोजी दुपारी एकुण १०,७६,००० रु ची चोरी झाली असुन त्याबाबत पो स्टे गाडगे नगर येथे गुन्हा दाखल आहे गुन्ह्याचे अनुशंगाने संशयीत म्हणुन भाडेकरु हिचे नाव पोलिसांना फि ने सांगितले वरुन पोलिसांनी तिची चौकशी दि.२८.०३.२३ रोजी केली यावरुन मनात राग धरुन घरी येवुन तिच्या घरामध्ये फाशी घेण्याचा प्रयत्न केला अशी माहीती फि चे नातेवाईकाने मोबाईल वरुन दिली तसेच दुसरे भाडेकरु नरेंद्र गुडधे यास सुदधा आवाज आल्याने त्यांनी आरोपीचे घरात जाऊन बघितले तेव्हा आरोपी ह्या खाली बसलेल्या व त्याचे घरातील छताला असलेला पंख्याला पांढरा केबल बांधलेला दिसत होता व त्याचे मुले रडत बसलेले होते. त्यानंतर फि हे नरेंद्र गुडधे यास घेऊन पो ठाणेला आले व रिपोर्ट दिला. अश्या फिर्यादी चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल** |
| ८ | **पो स्टे गाडगे नगर अमरावती**<br>**अप क्र ४२५/२३ कलम** | **अशोक नगर अमरावती** | **दि २८-०३-२३ चे १६.०० ते १६.३० वा दरम्यान**<br>**दि २८-०३-२३ चे १९.११** | **सरतर्फे नापोका गजानन बरडे ब नं ९८० पो स्टे गाडगे नगर अमरावती** | **गजानन अरुण आत्राम वय ४८ वर्ष रा अशोक नगर अमरावती** | **यातील हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांना गुप्तमाहीतीदाराकडुन खात्रीलायक माहीती मिळाली की तडीपार आरोपी हा हातात चाकु घेवुन दहशत पसरवित आहे अशा माहीतीवरुन जावुन शहानिशा केली असता आरोपी हा मा पोउपयुक्त परि १ अमरावती यांच्या दि.08.01.21 आदेशाने अमरावती शहर व ग्रामिण हददीतुन दोन वर्षाकरिता तडीपार असतांना मा वरिष्ठांच्या आदेशाला न जुमानता व कोणत्याही प्रकारची पुर्व परवानगी न घेता राजरोसपणे फिरतांना व दहशत पसरविता** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १४२,१३५ मपोका सहकलम ४/२५ आर्म अँक्ट | | वा | | | असतांना मिळुन आला.वरुन त्याची पंचासमक्ष झडती घेतली असता त्याच्या ताब्यातुन एक लोखंडी चाकु मुठ असलेला किं अं १५० रु चा घटनास्थळ जप्ती पंचनाम्या प्रमाणे जप्त करण्यात आला.अश्या फिर्यादी चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ९ | पो.स्टे नागपुरी गेट अमरावती अप क्र .१५२/२३ कलम १३५ मपोका ४/२५ आर्म अँक्ट सहकलम ७ फौजदारी कायदे सुधारणा अधिनियम | अँकेडमिक शाळेचे प्रांगणात गवळीपुरा अम | दिनांक २८/०३/२०२३ चे २०.३० वा ते २१.१० वा दिनांक २८/०३/२०२३ चे २२.२१ वा | सरतर्फे पो.उप.नि सुशिल कोडापे पो.स्टे नागपुरी गेट | जिशान अहेमद मोहम्मद फारुख वय-३० वर्षे रा.रजा मस्जिद जवळ,अंसार नगर अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की,नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील इसम हा अँकेडमिक शाळेचे प्रांगणात गवळीपुरा अम या परिसरात अनाधिकृतपणे हातात धारदार शस्त्र जवळ बाळगुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने फिरत आहे.अशा गुप्त बातमीदारचे खात्रीलायक माहीती वरुन पो.स्टाफ पंच व आम्ही घटनास्थळावर गेलो असता घटनास्थथळाची जावुन पंचासमक्ष पो.स्टाफचे मदतीने घेराव घालुन जिशान अहेमद मोहम्मद फारुख यास ताब्यात घेवुन पंचासमक्ष आरोपीची अंगझडती घेतली असता नमुद आरोपीचे ताब्यातुन एक धारदार सत्तुर ज्याचे पात्याची लांबी १४ इंच,रुंदी १.५ ते २ इंच,लांब टोकदार पाते,मुठ ५ इंच.असा धारदार सत्तुर ज्याची एकुन लांबी १९ इंच किंमत अंदाजे २५० रुपये प्रतिबंधीत लांबीचे शस्त्र बाळगुन दहशत पसरवितांना मिळुन आल्याने नमुद आरोपीने मा.पो.उपायुक्त सा यांचे आदेशाचे उल्लंघन केले.सदर आरोपीचे हे कृत्य कलम १३५ मपोका ४/२५ आर्म अँक्ट सहकलम ७ फौजदारी कायदे सुधारणा अधिनियम प्रमाणे गुन्हा होत असल्याचे फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ जुगार रेड :-

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १ | बडनेरा | २३७/२०२३ कलम १२(अ) महा जु. का. | सार्वजनिक संडास जवळ, आठवडी बाजार, नवी वस्ती, बडनेरा. | दि २८.०३.२३ चे १६.१५ वा. | दि. २८.०३.२३ चे १९.१२ वा. | सरतर्फे पोहेका शैलेश मोरे ब.नं.१०२९ पोस्टे बडनेरा अमरावती शहर | यसुफ खान युनुस खान, वय ५८ वर्षे, रा. कुरैशी नगर, नवी वस्ती, बडनेरा. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीप्रमाणे पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याच्या ताब्यातुन १) नगदी ६१०/- रू., २) वरली मटकाच्या जुगाराच्या चिठ्या, कि.००/- रू, ३) एक बॉल पेन, कि. अं. ५/- रू. असा एकुण ६१५/- रू. चा माल मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल |